THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY 7TH MARCH 1895.

*☞ Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालील आक्ट आलीजा गव्हरनर जनरल यांनीं तारीख ८ माहे फेब्रुआरी सन १८९५ रोजीं मंजूर केला, तो लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९५ चा आक्ट ४ था.

**सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, याचीं कलमें ३६६ व ३७१ हीं सुधारण्याकरितां आक्ट.**

ज्या अर्थीं सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचीं कलमें ३६६ व ३७१ हीं सुधारणें इष्ट आहे, त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

सन १८८२ चा आक्ट १०वा याच्या ३६६ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

१. सदरहू कायद्याच्या ३६६ व्या कलमाबद्दल पुढील कलम दाखल केलें पाहिजे; तें येणेंप्रमाणें:—

फैसला देण्याची रीत.

"३६६. (१) अवल हुकुमतीच्या कोणत्याही फौजदारी कोर्टांतील दरेक इन्साफामधला फैसला किंवा अशा फैसल्याचा सारांश,—

(अ) असा इन्साफ संपल्यावर लगेच किंवा पुढच्या कोणत्या तरी वेळाची पक्षकारांस किंवा त्यांच्या प्लीडरांस सूचना देऊन तशावेळीं उघड्या कोर्टांत, आणि

(ब) सदरहू कोर्टाच्या भाषेंत, किंवा आरोपितास किंवा त्याच्या प्लीडरास समजत असेल अशा दुसऱ्या कोणत्या तरी भाषेंत,

सांगितला पाहिजे, किंवा समजाविला पाहिजे.

मात्र इतकेंच कीं, अध्यक्षस्थानीं असणाऱ्या जज्जानें सगळा फैसला वाचून दाखवावा अशी त्याला फिर्यादीच्या पक्षानें किंवा आरोपिताच्या पक्षानें विनंति केल्यास त्या जज्जानें तो सगळा फैसला वाचून दाखविला पाहिजे.

(२). फैसला देण्यांत येईल तो ऐकण्यासाठीं, आरोपित अटकेंत असल्यास त्यास आणिलें पाहिजे, अगर तो अटकेंत नसल्यास कोर्टानें त्यास हजर राहाण्याविषयीं फर्माविलें पाहिजे; परंतु इन्साफ होतेवेळीं जातीनें हजर राहाण्याची त्यास माफी केलेली असेल आणि शिक्षा केवळ दंडाची असेल त्या प्रसंगीं तो फैसला त्याच्या प्लीडरच्या समक्ष सांगण्याचा अधिकार आहे.

(३) कोणत्याही फौजदारी कोर्टानें दिलेला कोणताही फैसला, तो देण्याकरितां जाहीर केलेल्या दिवशीं किंवा जागीं कोणताही पक्षकार किंवा त्याचा प्लीडर हजर नव्हता एवढ्याच कारणावरून, किंवा अशा दिवसाची व जागेची सूचना पक्षकारांस किंवा त्यांच्या प्लीडरांस किंवा त्यांपैकीं कोणत्याही असामीस कोणत्याही प्रकारें दिली नाहीं किंवा देण्यांत कोणतीही कसूर झाली एवढ्याच कारणावरून, गैरकायदेशीर होतो असें समजूं नये.

(४) या कलमांतील कोणत्याही ठरावावरून, कलम ५३७ यांतील ठरावांच्या व्याप्तीचा कोणत्याही प्रकारें संकोच होतो असें समजूं नये."

२. सदरहू कायद्याच्या ३७१ व्या कलमांत, "फैसला आरोपितास समजाविला पाहिजे, आणि त्यानें मागितली असतां त्या" या शब्दांच्या बदला "आरोपितानें मागितली असतां," हे शब्द दाखल केले पाहिजेत.

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,

आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

## लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख ८ माहे फेब्रुआरी सन १८९५ रोजीं मंजूर केला तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असे:—

# सन १८९५ चा आक्ट ५ वा.

### सन १८८९ चा क्यांटोन्मेंट आक्ट सुधारण्याकरितां आक्ट.

ज्या अर्थी सन १८८९ चा क्यांटोन्मेंट आक्ट सुधारणें इष्ट आहे, त्या अर्थी खालीलप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) ह्या कायद्यास, क्यांटोन्मेंट आक्ट सुधारण्याचा सन १८९५ चा आक्ट असें म्हणावें.

(२) तो सगळ्या ब्रिटिश इंडिआस लागू आहे, आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

सन १८८९ चा आक्ट १३ वा, ह्याच्या २६ व्या कलमांत जास्त मजकुर दाखल करण्याबाबद.

२. सन १८८९ चा क्यांटोन्मेंट आक्ट, ह्याच्या २६ व्या कलमांत खालील जास्त मजकुर दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:—

"परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणत्याही स्त्रीला उपदंशाचा कोणताही रोग झालेला आहे किंवा नाहीं तें अथवा ती स्त्री कसब करण्यास योग्य आहे किंवा नाहीं तें निश्चित करण्यासाठीं त्या स्त्रीची वैद्यकीय अमलदारांकडून अगर इतरांकडून जबरदस्तीनें किंवा मुदतीमुदतीनें तपासणी करण्याचा हुकुम अगर परवानगी ज्यांत दिलेली आहे असा कोणताही नियम, किंवा कोणत्याही क्यांटोन्मेंटांत कसबिणींस परवाने देण्याकरितां अगर कसबिणींची विशेष नोंद ठेवण्याकरितां अगर कसबाच्या कामास कायद्याची मंजुरी देण्याकरितां कोणताही नियम, सदर्हू प्रकारच्या कोणत्याही कानूमध्यें असूं नये."

(सही) जे. एम्. म्याकफर्सन,
आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.